# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


---

**स्मरणपत्र-२ :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/वृक्ष लागवड/निधी वितरण/२०१९/ 5150
दिनांक : 11 DEC 2019

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व पदविका, तसेच व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या
पदवी व पदव्युत्तर तंत्रशिक्षण संस्था
(पुणे विभाग)

**विषय :- वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत निधी वाटप करण्याकरीता, (दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजीची) माहिती सादर करणेबाबत.**

संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.८१/आस्था-२, दि.०६/०९/२०१९.
२. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १६/आस्था/निधी वितरण/२०१९/२८७, दि. २०/०९/२०१९.
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/निधी वितरण/२०१९/४३६३, दि. १९.१०.२०१९.
४. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १६/आस्था/वृक्षलागवड/निधी वितरण/२०१९/३१७, दि. १८/११/२०१९.
५. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/वृक्षलागवड/निधीवितरण/२०१९/४७६७, दिनांक २०/११/२०१९.
६. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/वृक्षलागवड/निधीवितरण/२०१९/४९६८, दिनांक ०३/१२/२०१९.

उपरोक्त विषयान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यांत येते की, सन २०१९-२०२० या वि-तीय वर्षाकरीता, वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत निधी वितरीत करावयाचा असलयाने, सन २०१६, २०१७, २०१८ व २०१९ मध्ये केलेल्या वृक्ष लागवडीबाबतची **बिनचूक** माहिती Dash Board / Profile Screen Shot सह सोबत जोडलेल्या विवरणपत्रात **info.ropune@gmail.com** वर **Excel Sheet, Soft Copy** व **PDF** मध्ये <u>दिनांक २७.११.२०१९ रोजी, दुपारी ०३.०० पर्यंत</u> ई-मेलव्दारे / खास दूतामार्फत या कार्यालयास सादर करण्याबाबत वरील संदर्भ क्रमांक ५ च्या पत्रान्वये आपणास कळविण्यांत आलेले होते. परंतु ब-याच संस्थांनी सदरची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह अद्याप या कार्यालयास सादर केलेली नाही.

(पुढील पानावर)

तसेच ज्या संस्थांनी विहित विवरणपत्रात माहिती सादर केलेली नाही अशा संस्थांनी सदरची माहिती अवश्यक त्या कागदपत्रांसह दिनांक ०५.१२.२०१९ रोजी, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करण्याबाबत वरील संदर्भ क्र. ६ च्या स्मरणपत्रान्वये, पुन्हा कळविले होते. परंतु अद्यापही ब-याच संस्थांनी याबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेले नाहीत हे खेदाने नमूद करावे लागते.

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या ज्या संस्थांनी वृक्ष लागवड निधी मिळण्याबाबतचे प्रस्ताव अद्याप या कार्यालयास सादर केलेले नाहीत अशा संस्थांच्या संस्थाप्रमुखांना पुन्हा कळविण्यांत येते की, शासनाने वृक्ष लागवड, कार्यकमाचे नियोजन, पूर्वतयारी, संभाव्य अडचणी, उपाययोजना सन २०१९-२० करीता उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून वाटप करण्यात येणार असल्याने, **दिनांक १३.१२.२०१९ रोजी, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** याबाबत आवश्यक ती पूर्तता करुन, आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह या कार्यालयास प्रस्ताव सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१) सदर निधी ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेला आहे. त्या कारणासाठीच याचा विनियोग करणे बंधनकारक आहे. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

**२) संबंधित संस्थांनी मजूरी, पुरवठा व सामग्री याकरीता केलेल्या खर्चाची मूळ देयके (Original Bills) / उपप्रमाणके (Vouchers) खास दूतामार्फत सादर करणे बंधनकारक आहे**

३) सदर निधीतून केलेल्या खर्चाचे वेगळे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

४) शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार संबंधित कार्यालयांनी संपूर्ण वर्षाकरिता आवश्यक निधीची गणना करुन वितरणाचे संपूर्ण वर्षाचे स्वतंत्र विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे. ज्यायोगे विवरणपत्रा नुसार निधीचा हिशोब परिपूर्ण होईल.

५) संबंधित संस्थेस सन २०१९-२० मध्ये वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांना तसेच शासनास किंवा शासनाने त्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास लेखा परिक्ष्णाकरीता संबंधित संस्था / कार्यालय यांची विवरणपत्रे व लेखापाहणीचा अधिकार राहील.यासाठी लेखे तयार ठेवावेत.

७) संबंधित संस्थेने दिलेल्या उद्दिष्टानुसार किंबहुना त्यापेक्षा जास्त केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या www.greenarmy.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन, त्याबाबतचा पुरावा Dash Board / Profile Screen Shot सह सादर करणे आवश्यक आहे.

८) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात यावे.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : विवरणपत्राचा नमुना.

प्रमाणित करण्यात येते की, बीजकात नमूद वस्तू या कार्यालयास सुस्थितीत प्राप्त झाल्या असून त्याची नोंद या कार्यालयाच्या दप्तरी घेण्यात आली आहे. सदर वस्तूंचा दर रास्त व योग्य आहे.

प्राचार्य / संस्थाप्रमुखांची स्वाक्षरी

## वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजीची सद्यस्थिती

| डी.टी.ई कोड | जिल्हा | तालुका | संस्थेचे नांव | २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१६ मध्ये दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष केलेली वृक्ष लागवड | सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या | केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड केली आहे का ? | ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१७ मध्ये दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष केलेली वृक्ष लागवड | सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या | केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड केली आहे का ? | १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१८ मध्ये दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष केलेली वृक्ष लागवड | सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या | केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड केली आहे का ? | ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१९ मध्ये दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष केलेली वृक्ष लागवड | सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या | केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड केली आहे का ? | सन २०१९ मध्ये मजूरीसाठी झालेला खर्च | सन २०१९ मध्ये पुरवठा व सामग्री साठी झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

संस्था प्रमुखाची स्वाक्षरी